क्रमांक : ६०८/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : १२ जानेवारी, २०२२.

**विषय :-** कोरोना विषाणू प्रसारातील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून या सचिवालयातील कार्यालयीन उपस्थिती नियंत्रित करणेबाबत...

**संदर्भ :-** १) महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागाचा आदेश क्र .डीएमयु/ २०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१, दिनांक ८ जानेवारी, २०२२.

२) या सचिवालयाचे परिपत्रक क्र.५३६/क-१, दिनांक ११ जानेवारी, २०२२.

**उपरोक्त संदर्भ क्र. २ वरील परिपत्रक अधिक्रमित करुन खालीलप्रमाणे सुधारित परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.**

**:: परिपत्रक ::**

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, राज्यातील कोरोना विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कार्यालयातील उपस्थिती नियंत्रित करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांची दैनंदिन उपस्थिती अधिकारी/कर्मचारी यांच्या संख्येच्या ५०:५० प्रमाणात (सत्र निहाय) पुढीलप्रमाणे दोन सत्रात (२ Shifts) पुढील आदेश होईपर्यंत नियोजित करण्यात येत आहे :-

- <u>पहिले सत्र</u> :- सकाळी १०.०० ते सायंकाळी ०४.००
- <u>दुसरे सत्र</u> :- दुपारी ०१.०० ते सायंकाळी ०७.००

(१) सर्व उप सचिव/अवर सचिव यांनी त्यांच्या अधिपत्याखालील कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांच्या दोन सत्रातील दैनंदिन उपस्थितीचे तातडीने नियोजन करावे व आठवड्याच्या दर शुक्रवारी त्याबाबत क-१ (आस्थापना) कक्षास कळवावे.

(२) संबंधित अधिकारी/कर्मचारी त्यांना नेमून दिलेल्या सत्रात उपस्थित राहतील याची संबंधित उप सचिव/अवर सचिव यांनी दक्षता घ्यावी.

आदेशानुसार,
(स्वाक्षरी)
**( सुभाष नलावडे )**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

..२/-

प्रति,

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद / महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.

६) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) सर्व समिती प्रमुख यांचे कार्यालय.

८) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

१०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कर्मचारी.

११) 'क-२' (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१२) सर्व विधीमंडळ पक्ष कार्यालय.

१३) व्यवस्थापक उपहारगृह, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१४) निवडनस्ती.

**प्रतिलिपी :-**

१) उप अभियंता (विद्युत), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

२) शाखा अभियंता (स्थापत्य), सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.